३

अंतरीचे वाटचाल. जेथे जाणे मी टाळत आले. खूप पळापळीचे, धावपळीचे जीवन व्यतीत केल्यावर असे जाणवत राहिले की ही धावपळ व्यर्थ आहे.तिला अंतच नाही. अनेक जीवने या धावपळीत घालविले आहेत. हेही जीवन असेच जाऊ नये ही सुमति सुचली. पळाले खूप पण पोहोचले कुठेच नाही. गंतव्यच ठरले नाही. मृत्यू हे गंतव्य नाही. मृत्यू म्हणजेही दौडच होय. या गतीतून दुसऱ्या गतीत. गती हा आत्म्याचा स्वभावच नाही की काय ? थोडे थांबावे, आत डोकावून पहावे. कदाचित् सुगंधाने वेडे झालेले हरीण तर नाही ना आपण ? कस्तुरी स्वत: जवळच आणि तिचा शोध अन्यत्र घेण्याचा वेडेपणा तर आपण करीत नाही ना?

एके ठिकाणी वाचले होते की जगात दोन प्रकारचेच भिकारी आहेत, एका प्रकारच्या भिकाऱ्याची वस्त्रे फाटकी आहेत, मन सदैव मागणाऱ्याचे आहे. चेहरा दीन-दुबळा आहे. तर दुसऱ्या प्रकारच्या भिकाऱ्याच्या अंगावर वस्त्रे सम्राटाची आहेत, सत्तेची आहेत, मत्तेची आहेत पण मने दोघांचीही भिकारी आहेत. सतत मागत राहणे, मिळवित राहणे. हव्यास. केवळ हव्यास. मान मरातब मिळाला, मोठमोठी पदे मिळाली तरी आणखी मिळविण्याचा व्यामोह दोघांनाही आहे. तृष्णा वाढतेच आहे. हे आशेचे मृगजळ सापडलेला कोणीच कसा इतिहासात नोंदलेला नाही. मन शांत होईल, आनंदाचे फवारे उसळू लागतील, सृष्टीच्या कणाकणातून फुलून येणारे सौंदर्य न्याहाळता येईल असा क्षण केव्हा येणार ? आतील प्रभुच्या दर्शनाचा योग केव्हा येणार ? देवळे, तीर्थे, मंदिरे धुंडाळून झाली. पण शांती मिळालीच नाही. माझे हे भटकणे, माझी ही भ्रमंती चुकीचीच नाही ना ? कशासाठी हा सारा पसारा ? कुणी चार शब्द आपल्या संबंधी चांगले बोलावे म्हणून ? आपली स्तुती करावी जगाने म्हणून ? जग इतके विसराळू आहे की ते अशांची कधीच आठवण करीत नाही.

अंतर्यामी साठलेला प्रज्ञेचा दिव्य खजाना पाहणेच झाले नाही. आतील मांगल्याचा कधी शोधच घेणे झाले नाही. बाह्य जड विश्वातील पदार्थांच्या संग्रहात व शोधात मी गर्क राहिले. बाह्य संपत्तीने, सत्तेने आतील शून्याता कशी भरू न येणार ? ते शक्यच नाही. आज असे वाटते की तारूण्य आहे , घ्या उपभोगून. उद्या कोणी पहिला आहे ? उपभोगांतून मन शांत होते का? झाले आहे का ? मनाल नित्य दौड हवी आहे. प्राप्तीचा आनंद क्षणभरच.

मनला प्राप्तीचे वेड नाही. नित्य नवीन नवीन दौड, नित्य नवीन नवीन आशा-इच्छा-आकांक्षा करीत सुटते ते.

मला असेही आढळले की सन्यास आतून उत्फुल्ल झालाच नाही. सन्यास पक्व झालाच नाही. कसा होणार ? त्यांची दौड आत्म्याच्या दिशेने झालीच नाही. एके दिवशी वाटले की आत शिरण्याचा एक मार्ग आहे मौन. एक साधन आहे मौन.

परपदार्थाच्या व्यामोहातून मोकळे होण्यासाठी मौन. निष्पंद मन. मनातील सर्व हालचाली, क्रियाकलाप, त्या मनाचे नसते उपद्‌व्याप थांबविण्याचे एक साधन आहे मौन. मौन म्हणजे आत्म्याला घातलेली साद. बाळाने आईकडे दुडुदुडु चालत जावे तसे मौनाने आत्म्याकडे जावे." सोडा तो खेळ, संध्याकाळ झाली, " अशी आईची हाक कानात आली. त्या हाकेने मी मी जागृत झाले." पुरे झाला हा खेळ " असे म्हणून मी मौनाच्या कुशीत शांतपणं विसावले.

निरभ्र, निळ्याशार आकाशाने माझ्यावर पांघरूण घातले. शांत सरोवरावर आकाशाचे प्रतिबिंब पडावे तसे परमात्म्याचे प्रतिबिंब पडले .मौनातूनच तेथे त्याच्याकडे जाण्याचा मार्ग मला सापडला. मार्ग सापडला म्हणणे थोडेसे चूकच. मार्ग नव्हताच गंतव्यच तेथे होते.परमात्म्याच तेथे होता. मी परत येईन या धावपळीतून, या संसारचक्रातून अशी त्याची खात्री होती. जणू तो परमात्म्याच व्याकुळ होता मला भेटण्यासाठी. त्या परमात्म्याचे दोन्ही बाहू पसरलेले होते मला कवटाळायला. एखादे कोकरू वाट विसरून जंगलात भटकत असावे व त्याचा मालक त्याला शोधत शोधत यावा असे झाले. माझी त्या चिन्मय परमात्म्याची गाठ पडली. अनेक शास्त्रांत ज्याचे वर्णन वाचले, ज्याच्यासाठी अनेक वर्षे तपश्चर्या केली, परिषह सहन केले, तो परमात्मा भेटला. तो कोठे गेलाच नव्हता. तो तेथेच उभा होता एखाद्या सुमेरू प्रमाणे. जेथे तो होता तेवढीच जागा सोडून अन्यत्र मी त्याचा शोध घेत राहिले.

माझी दिव्य विभूती, माझा चैतन्यपुरूष माझ्यातच होता. पण अज्ञानाच्या ग्रहपडिमुळे मी सदैव भटकत राहिले. राम सीतेच्या व्याकूळ विरहाने होऊन ज्याप्रमाणे मार्गतील प्रत्येक झाडा-फुलांनी, पशु-पक्षांना सीतेसंबंधी विचारत होता, त्याप्रमाणे मीही माझ्या त्या प्रिय परमात्म्याला पर-पदार्थातच शोधत राहिले. त्यांनाच परमात्मा समजून कवटाळत राहिले. देहालाच आत्मा मानत राहिले. विकार-वासनेलाच मी परमात्मा मानत राहिले. त्या विकारवासनांच्या सुर्वणमय रूपाने मला मूर्च्छित केले. त्या मूर्च्छित अवस्थेत मी जागृत आहे. मी ज्ञानी आहे, मीच परमात्मा आहे, असा घोष करीत आले.

भ्रांता मनाला बळी पडून, उत्कंठीत होऊन मी स्वत:ला विसरत आले. जीवनातील बहुमोल क्षण मी त्या भ्रांतीतच काढून राहिले. आता मात्र त्या मौनातून-मौनाच्या दर्पणातून अंतर्यामी सुप्रतिष्ठित परमात्म्याचे बिंब दिसून आले.

कधीही ऐकू आले नाही असे दिव्य संगीत आत्म्याच्या तारांतून बाहेर पडू लागले. नव्हे संगीत तर तेथेच होते पण ते ऐकण्याची कला मी विसरू न गेले होते. आपण सारे ऐकण्याची कला विसरलेले लोक आहोत. महावीरांनी सर्व प्रथम श्रावत ( ऐकणारा ) व्हायला सांगितले, याचे मर्म जाणवू लागले. भगवंताची वाणी आपण ऐकतच नाही. आम्ही आमच्या विकारांचीवासनांची, आशा- आकांक्षाचीच वाणी ऐकतो. ऐकण्याची कला ही सर्वोत्तम कला आहे. शून्य होऊन प्रभूची वाणी ऐकतो येणे हे भाग्याच खरे,पण तेही भाग्य आमच्या नशिबी नाही. कुणी कांही सांगत असेल तर मनातल्या मनात आम्ही प्रतिवाद करत असतो. त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता त्याचे बोलणयाने मन प्रतिक्रिया व्यक्त करीत असते. बाहेर कुठे कुत्रे ओरडत असली तर झोपमोड होते. जोरजोरात लाऊड स्पीकरवर गाणी लागली असतील तर मन बचैन होते. कारण मन रिॲक्ट करते. विरोध प्रदर्शित करते.खरे तर झोप न येण्याचे कारण मनात उद्‌भवलेले विरोध, प्रतिक्रिया हे आहे. ( रेझिस्टन्स ) प्रगट होत नाही तो शांतपणे झोपून जातो. त्याला ऐकू येते पण मन त्याचा विरोध करीत नाही. म्हणून ते शांत असते.

मौनाने हेच साध्य होते. कोणतेही भौतिक अडथळे मौनाला नष्ट करू शकात नाहीत. मौन सर्व विरोधाल पुरू न उरू शकते. याचे कारण मौन म्हणजे अविरोध, अप्रतिरोधक शक्ती .ती विरोधातीही शांत असते. मौन संघर्ष करीत नाही. मौन म्हणजे मनाची रिक्तता. वाचेची शून्यता. बोलण्याचे वेड फार लागले आहे. सारखी बडबड आपण करीत राहातो. रस्त्यावरू न जाणऱ्या माणसांच्याकडे मी पाहते. ते आपल्याशीही बडबडत असतात. हातवारे करीत असतात.यामुळे चैतन्यशक्तीचा ऱ्हास होते. अर्थहीन, रसहीन बोलत राहणारी माणसे मी पहिली आहेत. त्यातून काहीही निष्पन्न होत नाही.

वाचा शक्ती प्रचंड खरीच. पण मौन त्याहूनही बलशाही आहे. मौन हे दिव्य रसायन आहे. त्या रसायनाने आध्यात्मिकतेचा उदय होतो. जैनधर्मात सामायिक या सुंदर शब्दाचा उपयोग केला आहे. साम्यभावाकडे, समत्वाकडे,
निर्द्वंदतकडे नेणारे ते सामयिक. आत्म्याशी अविरोध नाते जोडणारे ते सामायिक. मौनाला अर्थ प्राप्त करू न देते ते सामायिक.परंतु मी पाहिले की सामायिक करताना काही जण काही पाठ म्हणत असतात. अगदी यांत्रिकपणाने. मन वेगळेच चिंतन करते, तोंडातून वेगळेच पाठ

म्हटले जातात. ही सामायिक क्रियाच नव्हे, असे मला वाटू लागले. श्लोकांच्या पठनाने सामायिक होऊ शकत नाही हा माझा अनुभव आहे. वाचक्रिया थांबवल्याशिवाय मौनात प्रवेश होत नाही. एखाद्या खोल विहिरीत उडी मारावी व आतल्या सुशीतल, विस्तीर्ण जलायाशयात शांतपणे स्थिर व्हावे तसे.

इतकेच नव्हे तर मौन ही एक ध्यान पध्दतीही आहे. घर जसे झाडून व स्वच्छ केल्यावर, धुऊन पुसून काढल्यावर जसे प्रसन्न वाटते, तसे मौनाने सर्व चिंता काळजी हुरहूर इ. काजळी स्वच्छ होते.

आजच्या धावपळीच्या, गुंतागुंतीच्या मनावर ताण आणणाऱ्या या युगात मौन ही दिव्यौषधी आहे असे मला वाटते.

मला एक साधकाची गोष्ट माहिती आहे. त्याने मौनाची चांगलीच साधना केली होती. पण तो होता एक कंपनीला नोकरीला. मालक फारच उर्मट, उध्दट, गर्विष्ट, चढेल होता. कामगारांना वाटेल त्या शेलक्या शब्दानी बोलायचा, पाणउतारा करायचा. हीन लेखायचाएवढयाने त्याचे भागायचे नाही. या सर्व क्रियाकलापांत त्याला खूप असुरी आनंद वाटायाचा. त्याचा अंहकार पोसला जायचा. स्वताचे श्रेष्ठत्व व मोठेपणा किंवा बडेजाव सिध्द करायला इतर कोणतेही गुण त्याच्यात नव्हते.गुणांचे सामर्थ्य नसले की माणूस विकांराचा आसरा घेतो. तसे त्याचे वागणे. एके दिवशी तो साधक त्याचा कडे काही विचारायला गेला.मालकाला वाटले की हा रजा मागायला आला असवा. झाले. त्याचे पित्त खवळले. तो संतापला. खूप शिव्याशाप देऊ लागला. साधक शांतच होता. त्याचा मनात कसलीच प्रतिक्रिया झाली नव्हती . रेझिस्टन नव्हता. केवळ उभा होता तो.

मालक शांत झाल्यावर त्याने शांतपण म्हटले- “ मी जाऊ शकतो ?”

“ तुम्ही आला कशासाठी होता ? “ मालकाने विचारले.”

“ मी हे सांगायला आलो होतो की तुमच्या घरू न फोन होता. तुमची पत्नी सांगत होती की तुमचा मुलागा जिन्यावरू पडून जखमी झाला आहे. तुम्हाला सूचना द्या.”

“ मग तू इतक्या उशीरा मला सांगतोस. इतके शांत राहून तू मला हे सांगतोस. ” पुनः त्याचा पारा वर चढला.

साधक शांतपणे म्हणाला" " आपणाला ऐकण्याची सवयच नाही. कोण कशासाठी आपल्याकडे आला हे विचारण्याची शांत प्रवृत्तीच आपण हरवून बसलात. आपण विचारले देखील नाही की मी का आलो ? "

असे आपल्या दैनंदिन जीवनात घडत आहे. आपाली पत्नी सांगते एक, आपण ऐकतो एक. शिक्षक सांगतो एक विद्यार्थी ऐकतात दुसरेच. राजकराणी सांगतात एक जनता ऐकते भलतेच. कुठे ताळ्मेळ्च राहत नाही. का ? महावीरांचे उत्तर आहे- " आपण कान हरवून बसलो म्हणून." ऐकण्यासाठी, जाणून घेण्यासाठी प्रबोधनासाठी मौनाने बसत आले पाहिजे. संयामाने,इंद्रियांना बंड करण्याची प्रेरणा मिळ्ते. इंद्रिया प्रतिकार करतात. प्रतिकार म्हटला की संघर्ष आलाच. संघर्षने संतुलन राहत नाही. म्हणून संयमपेक्षा मौन अधिक कार्यशील आहे.

तीर्थकर महावीरांनी दीक्षा घेतली. ते जंगलात निघून गेले. जवळ जवळ बारा वर्ष मौनातच राहिले. आत्मसाधनेला जंगला शिवाय चांगली जागा त्या काळी नसावी. जंगलातील झाडे मौन प्रतीकच. सारी वृक्षराजी, लता-वेली मौन असतात. मौनातच फुलणे-बहरणे-विकसणे चालू असते त्यांचे. मौनमय वातवरण सर्वत्र पसरलेले असते. क्वचित पक्षांच किलबिलाट, श्वापदांचे आवाज येतात. रातकिड्यांचे संगीत असते त्या मौनाच्या जोडला. पण त्यावेळी मन रेझिस्ट करित नसते. ते आवाज इररिलिव्हंट ( अ- संबंधित ) असतात. त्या आवाजांनी तन्मयतेत फरक पडत नाही.

भगवान होण्यापूर्वी महावीरांना मौनातूच जावे लागेल.त्या मौन काळ्तच आत्म्याचे सम्यक् दर्शन घडेल. आत्म्या- भोवती वेटोळे घालून बसलेले विकार-वासनांचे सर्पराज त्याचवेळी दिसून येतात. कर्माच्या धुळीने माखलेले आत्म्याचे ते ज्ञानमय शरीर त्याचवेळी दृग्गोचर होते. आसक्तीचे, मोहाचे पाश किती आणि कोठे क्ठेे दृड झाले आहे समजून घ्यायला मौनच हवे.

आत्मशक्ती अंनतता कळून यायला मौनाचेच माप हवे. मौनात सर्व विशर्ण होत जाते. मौन एक तेजाब आहे. सुर्वाणाभोवती असलेली घाण तेजाबाने विनष्ट होऊन जाते. इंग्रजीत ॲसिड टेस्ट म्हणतात. मौन ही आत्मासामर्थ्याची ॲसिड- टेस्ट आहे.

त्या मौन-साधनेतुन मला खूप शिकायला मिळ्ले. एखद्या गोतेखोराने समुद्राच्या तळात उडी मारू न तेथील मौक्तिक आणवेत तसे मी करू लागले. मौनाचा आनंद आगळा,

एकदा त्या दिव्य, ज्ञानमय आत्म्याची प्रचीती आली की मग सतत तिकडे लक्ष लागू लागले.दिवासातील बराच वेळ मी त्या मौनसाधनेतच असे निस्संग व्हायचे तर मौनच उपायोगी पडते. हा अनूभव मला आला. सांसारिक, प्रापंचिक अलिप्तता यायला मला मौनच सहाय्यकारी ठरले.

" मौनं सर्वाथा साधनम् " याचा प्रत्यय मला आल. मौनाची साधना करण्याआधी अंतरीचा भगवान आत्मा  समजून घेणे अत्यावश्यक आहे. ज्ञानपूर्वक अंन्तस्तत्व जाणणे जरू रीचे आहे.

४

समाजाचे जिवंतपणाचे लक्षण आहे सतत नवीन नवीन समस्या उत्पन्न होणे. समस्यांची प्रदीर्घ मालिका, प्रश्नावलींची रांग सतत मानवी जीवनाशी संबंधित आहे. बाह्य भौतिक विश्वाचे विशाल भांडार. विविध पदार्थांचे आत्म्याभोवती असलेले वलय. यातूनच मानवाला मार्ग काढायाचा आहे.

ज्ञानाची अमर्यादा शक्ती म्हणजेच चित्शक्ती. त्या ज्ञानला काहीही मर्यादा नाहीत. विश्वाला गवसणी घालूनही ज्ञान-शक्ती उरते. यालाच कुणी ' ब्रम्ह ' म्हटले आहे. शरीर त्याचे आधार-स्थान आहे. शरीरातील ब्रम्हकेंद्राव्दारे विविध वस्तूंच्या गुण-स्वरू पांचे ज्ञान होते. इंद्रिये ही माध्यमें तशी फारच कमी शक्तीशाली. परंतु त्या इंद्रियामागील ज्ञानशक्ती अनंत. इंद्रीये पदार्थ जाणतात पण आपआपल्या कुवतीने. चष्म्याचा शोध नव्हता तेव्हा डोळे असून आंधळे होऊन राहावे लागत होते. विद्युत नव्हती तेव्हा अंधारात सुख मानून राहवे लागत होते. विज्ञानाने ज्ञानाची शक्ती वाढविली. इंद्रियांची शक्ती कमी पडली तर इतर पदार्थांची मदत घेऊन ज्ञानाची कक्षा वाढविली गेले.

अणूचे विभाजन करू न त्याद्वारे प्रचंड ऊर्जा निर्माण करण्यात आली. पेट्रोल, रॉकेल इ. खनिज तेलांचा शोध लावून त्यातील सामर्थ्य ज्ञानानेच प्रगट केले. अनेक कूट वाटणारे प्रश्न मानव ज्ञान-विज्ञानाने सोडवू लागला. अगदी चंद्र, गुरू , बुध, शनि या ग्रह-नक्षत्रांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचे भाग्य मानवाने मिळविले.

विज्ञाने मानवाला बहाल केलेली विविध सुखे, सुविधा, सोयी पाहिल्या म्हणजे मला एक प्रकारचा वेगळाच आनंद होतो.विज्ञानाच्या प्रगतीने आईनस्टाईनसारखे काही महापुरू षही

घाबरू न गेले होते. विज्ञान हे उदासीनच आहे. वस्तूंचे गुण-धर्म उकलून दाखविणे एवढेच त्याचे काम. परंतु लोभी, मत्सरी, अहंकारी मानवाने त्या विज्ञानाने हिंसेचे, युध्दाचे महान संकट मानवजातीवर लादले आहे. ते पाहूनच कुणी विज्ञानवर टीका करतो. विज्ञानाच्या नावाने बोटे मोडणारेही अनेक आहेत. पण मला त्यात वावगे काही दिसत नाही. विज्ञानाचा विकास घडविण्यात मानवाची ज्ञानशक्तीच कारणीभूत आहे. ज्ञानमय आत्म्याच्या प्रगतीचाच तो भाग आहे. विज्ञान विकसित झाले नव्हते तेव्हाही हा ज्ञानमय आत्मा विद्यमान होता. ज्ञानमय आत्मायाचे नित्य अस्तित्वच विज्ञानाने सिध्द केले आहे. त्या आत्म्याचे स्वमित्व मान्य केले आहे. हे स्वमित्व मान्य व्हावे हाच त्याचा स्वभाव आहे.

मानवजात जेव्हा नुकतीच रांगायला लागली असेल, जंगल खोऱ्यातून, गिरी-पर्वतातून राहात असेल, भयंकर निसर्गाशी झुंज देत असेल तेव्हाही ही ज्ञानशक्ती त्याच्या जवळच होती. जुन्या पुराण भाषेत सांगायचे तर हा मानव जरी नरकात गेला असेल, तेथील भयानक जीवन जगात असेल तेव्हाही  ही ज्ञानशक्ती त्याला साथ करीत होती. त्या दिव्यशक्तीतून त्याला सदैव प्रकाशच मिळत आला. प्रकाशाकडे जाणे हाच त्याचा स्वभाव राहिला आहे. ज्ञानाच्या बळावर सदैव उत्क्रांत होत जाणे हा त्याचा स्थायी भाव.

त्याच एका महत्तम शक्तीने त्याने या विश्वाला सुंदर बनविण्याचा प्रयत्न केला. जे जे पूर्वी अनाकलनीय वाटत होते, अशक्यप्राय वाटत होते, मानवाच्या बुध्दीपलिकडचे वाटत होते, ते ते त्याने आपल्या ज्ञानशक्तीचने आकलनीय, शक्य व बुध्दीगम्य करू न टाकले. विविध रोगावर त्याने विजय मिळिवला, नवीन नवीन चिकित्सा पध्दती, औषधे. उपचार, साधने त्याने शोधून काढली. त्यामुळे मानवाचे आयर्मान, आरोग्य,  सौंदर्य व सुबत्ता यात
विज्ञानाने आमूलाग्र बदल करू न टाकला आहे.

जेव्हा मी लहान होते तेव्हा मला आठवते की औषदपाण्याची सोय लहान खेडयातून नव्हे तर जिल्हयाच्या ठिकाणीही मिळणे दुरापास्त असे. सुयोग्य चिकित्सेच्या व औषधांच्या अभावी अकाली मरण पावलेले अनेक जाणचे मृत्यू मी पाहिले आहेत. रू ढी व जुन्या खुळचट कल्पनांमुळे देव-देवतांची पूजा करू न, मंत्र-तंत्र, ताबीज-गंडे, मांत्रिक यांचा उपचार करू न घेणारेच फार असत. ज्ञानाच्या विस्ताराने या गोष्टी फोल ठरलेल्या आहेत. ज्ञानाचा प्रकाश जो जो या भूलोकी पसरत जाईल तो तो अनेक अज्ञानजन्य गोष्टींचा निरास होत जाईल.

ज्ञानशक्तीचा पूर्णपुंज असलेला आत्मा जसजसा स्वतःचा विकास करू  लागेल तसतसे भौतिक जगच नव्हे तर आध्यात्मिक विश्वही प्रगत होत जाईल. आंनदाने उत्फुल्ल

झालेले ज्ञानमय जीवन घालविणारी सुप्रजा या भूमीवर पूर्वीही अनेक वेळा राहिला आहे. या पुढेही ते अशक्य नाही, अशी मला आशा वाटते. आज मी भयंकर शस्त्र-स्पर्धा, भोगोपभोग स्पर्धा, संपन्न होण्याची स्पर्धा चालू आहे त्यामागील विकारशक्तीही आत्म्याचीच आहे. त्या विकारांचे रू पांतरण विवेकात-प्रज्ञेत होणारच. प्रज्ञा ही सुप्त असली तर हे विकारांचे विश्व जागृत होते. दानवांचे चाळे, त्यांचे हिंसाचार, त्यांची अधम प्रवृत्ती तोपर्यंतच चालते जोपर्यंत प्रज्ञाशक्ती जागृत होत नाही .प्रज्ञेचा जसा निद्राकाल आहे, तसा जागृतीचा काळही आहे. त्या प्रज्ञाशक्तीला मूर्च्छित करणारे अज्ञान खरे नाही. अभय जागृत होत नाही तोपर्यंत भीती. अहिंसा जागत नाही तोपर्यंत हिंसेचा नंगा नाच. आपण याही काळात पहिले की महात्मा गांधी सारख्या अगदी सामन्य माणसाने असामान्यत्व प्राप्त केले. झोपी गेलेला भारत जागृत केला. त्यांच्यात स्वाभिमानाचे तेज, ज्ञानाचा प्रकाश, स्वातंत्र्याची प्रीती जागृत केला.एवढा प्रचंड देश केवळ थंड गोळा होऊन पडला होता.गुलामगिरीत खिचपत पडला होता. किंकर्तव्यमूढ बनला होता. रोग माहित झाला तरी औषध सापडले पाहिजे. ते औषध देणारा सुयोग्य चिकित्सा सापडला पाहिजे. गांधीजींना आपल्या आत्म-बळावर ते काम पार पडले. जातीवंत विव्दान, कामसु व सेवाभावी कार्यकर्त्यांना त्यांनी एकत्र आणले. त्यांच्यातील मरगळ संपवून त्याना कामाला लावले . देशातील दारिद्र्य संपावे, मानवाने स्वतःच स्वतःचा विकास करू न घ्यावा, स्वावलंबनाचा स्वीकार करावा, यासाठी त्यानी आपले जीवन खर्ची घातले. देशाचे सामर्थ्य म्हणजे भौतिक संपत्ती नाही. मानवाचे खरे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी वसत असलेली प्रज्ञा. त्या प्रज्ञेची कास धरू नच मानवजातीचा विकास होईल. तो विकास साधताना कोणत्याही मानवजातीची पिळवणूक होणार नाही याची काळजी घेण्यासही त्यांनी शिकविले. त्यांचा मार्ग अहिंसेचा, सत्याचा आणि अपरिग्रहत्वाचा होता. भारताचाच नव्हे तर जे जे मागासलेले देश आहेत त्यांचाही विकास, समृद्धी त्याच मार्गाने होणे अपरिहार्य आहे.

पण आम्हाला घाई आहे अमेरिकेसारखे संपन्न होण्याची. लवकरात लवकर विकसित होण्याची. पण या घाई- गडबडीत आम्ही आमचे स्तत्व वितरू न चाललो आहोत. ज्यांना या स्तत्वची जाणीव नाही असेच आज लोक सत्तेच्या ठिकाणी जाऊन बसले आहेत. देशाचा आत्मा, देशाचा अस्मिता, देशाच्या उज्वल आध्यात्मिक परंपरा टाकून होणारा विकास विनाशाकडे नेईल हे त्यांचे सांगणे होते.

मला एक गोष्ट आठवते. एका फार मोठ्या घराला आग लागली. ऐश्वर्यसंपन्न व्यक्तीचे घर होते ते. अनेक लोक धावून आले आग विझवायला. त्यांनी घरातील बहुमूल्य सामन, दाग-दागिने, फर्निचर बाहेर काढले. घरातील माणसांनाही वाचविले-

तेव्हा एकाने घर मालकाला विचारले-"आता आणखी कुणी नाही ना ? " त्या माणसाने आपल्या पत्नी पहिले. सारेच भीतीग्रस्त होते. पत्नीने आपल्या सर्व सामानाकडे पाहिले. आणि हंबरडाच फोडला." माझा बाळ कुठे आहे ? तो पाळण्यात तर झोपला नाही ना ? " काही माणसे आत पाळाली. घर जळतच होते. भिंती कोसळू पाहात होत्या. घराचे छप्पर पडायच्या बेतात होते. इतक्यात पाळण्यातील बाळाला घेऊन एकजण पळत बाहेर आला. पण तो पण बाळ जिवंत नव्हाता.

आईने झेप घालून त्याला उराशी घेतले. पण सारे संपलेच होते. ती खूप रडत होती. आरडा-ओरडा करीत होती. तिचे एक वाक्य मात्र सर्वांनाच वेदना देऊन गेले. ती म्हणाली- " सर्व वाचविले खरे. पण या सर्वांचा स्वामी मात्र वाचू शकला नाही. "

तीच गोष्ट आपल्या विकासाबाबत होत आहे. मानवाचा आत्मा, त्याची सांस्कृतिक परंपरा, आध्यात्मिक ठेव गमावून देशाचा विकास होऊ नये. आम्ही सारेच समृध्दीच्या मागे धावत आहोत. पण समृद्धी ज्याच्यासाठी हवी आहे, त्याला वाचविता आले पाहिजे. समृध्दीचा उपभोग घेणारा ' स्वामी ' वाचला पाहिजे. तो स्वामीच केंद्रबिंदू आहे. आजच्या शिक्षणा क्षेत्रातील विकासाची हीच स्थिती नाही का ? ज्या बालकासाठी शिक्षणाची व्यवस्था करायाची आहे, त्याचाच विचार केला नाही . अमेरिकेतील शिक्षाणाचीपध्दतीचा विचार करून या देशातील शिक्षणाची उभारणी करण्याचा प्रयत्न होत आहे. जगाचे शिक्षण करणाऱ्या भारतावर ही पाळी आली आहे ज्या भारताने कालिदास, पाणिनी, भवभूती, शंकर, कुंद कुंद, पूज्यापाद अकलंक, नागर्जुन यासारख्या शेकडो विभूती दिल्या, त्या भारतावर तंत्रज्ञान विकत घेण्याची पाळी आली आहे.आली आहे हे म्हेणणे संयुक्तिक नाही. ही अवस्था लादली गेली आहे. आजही देशात बुध्दिमान, प्रज्ञावान बालकांची कमतरता नाही, कुशल, प्रज्ञावान तरूणांची वाण नाही. पण ज्यांच्याकडे आज सत्ता आहे त्यांचे डोळे अमेरिकेकडे लागले आहेत. आम्हाला दूरचे दिसते पण जवळचे दिसत नाही, अशी दुरवस्था आहे. शिवाजीला राजकारणेचे धडे कोणी दिले होते ? त्याचे सैनिक शिक्षण कोणाच्या महाविद्यालयात झाले होते ? शूर, मर्द मराठे नांगर टाकून

सैनिक कसे बनले ? यांची उत्तरे आहेत. ती उत्तरे घरातच आहेत. 'स्व' हे त्याचे उत्तर. परावलम्बन ही विकृत आहे. दुर्बळपणा आहे.

मला ते दिवस आठवतात जेव्हा मी स्त्रियासाठी श्राविकाश्रम चालवू लागले. एकच होते मनात स्त्रियांचे संबंधीची करूणा, प्रेम, ममत्व. त्याच बळावर मी माझे काम चालू केले. ज्ञान कमी जास्त असू शकते. पण जे काम आपण घेतो ते निष्ठेने, संयमाने, जागरू पणे करण्याची जिद्द हवी. ही जिद्दच जीवाचा स्थायीभाव आहे. आत्म्याच्या वीर्यगुणाचा अविष्कार आहे. आत्माच्या अंनत सामर्थ्याची ती खूण आहे. निष्ठा तिची पाठीराखीण आहे.

त्या जिद्दीमुळेच मला मार्ग दिसत गेला. प्रेमाची पाखरण केली की अनेक प्रश्न सुटतात हा माझा अनुभव आहे.

प्रेम ही ज्ञानशक्तीची अधिष्ठात्री देवताच आहे. अपार प्रेम ज्ञानाशिवाय शक्य नाही. सर्व जीवसंबंधी वाटणारी करू णाच मानवाला कर्तव्याची वाट दाखवित असते. माझा मार्ग प्रेम शक्तीने अधिक विस्तारित केला. संकुचितपणाचा पडदा तिने दूर सारला. दुःखितांचे अश्रू पुसण्यास लागणारे सामर्थ्यंही त्यानेच आले. सामर्थ्य सार्थकी लावायचे काम ज्ञानशक्तीने केले.

ही ज्ञानशक्ती केवळ ग्रंथ वाचनाने आली असे मला वाटत नाही. तसे असते तर मी पढिक-पंडित झाले असते. मी ते मुद्दामच टाळले. कर्तव्य व सेवा करीत करीतच मी शिकत गेले. माझे गुरूदेव श्री स्वामी समंतभद्र महाराज यांचा आदर्श मी माझ्यापुढे ठेवला. त्यांनी आपल्या सेवा व त्याग यांच्या सामर्थ्याने जैन समाजालाच नव्हे तर भारतीयांना आश्रम पध्दतीने गुरूकुल प्रणालीचे श्रेष्ठत्व पटवून दिले. समृध्दीबरोबर संस्कृती देणारे शिक्षण त्यांना अभिप्रेत होते. जेथे संस्कृती टिकणार नाही, ते शिक्षण त्यांना नको होते. आधुनिकतेला विरोध न करताही त्याच्या सहकाराने समुचित शिक्षणप्रणाली त्यांनी पुढे आणली. खरा समवाय साधला. मीही त्यांचेप्रमाणे आपल्या कार्यात आत्मा ओतीत राहिले. फळापेक्षा ही कर्तव्य श्रेष्ठ हीच भावना मनी ठेवीत आले. माझ्या आत्या राजुलमती अम्मा यांची शिकवण मला माझ्या जीवनात उपयोगी पडली. त्यांच्या सहवासाने जीवनात सुगंधता, कार्य-परायणात, अनासक्त सुयोग साधता आला. आश्रम पद्धती साकारली.

हजारो स्वावलंबी, सुसंस्कृत, प्रज्ञावान महिलांना मी माझ्या डोळ्यापुढे वाढविले. त्यांच्या जीवनांत समरस झाले. त्यांच्यात बालाहुनी बाल होऊन राहिले. त्या शैशवाला जपण्याचे श्रेय मला मिळाले. शैशवाला सुसंस्कारित, आचार संपन्न व जीवनोन्मुख

बनविण्यासाठी माझी खूप धडपड असे. त्या धडपडीतून मी आधिकाधिक आत्मकेंद्रीत झाले. सर्व काही व्याप सांभाळतानाही मी स्वत:ला विसरले नाही. आत्म-साधनेचे विविध दालन माझ्यासाठी खुले होत गेले. निर्लेप भावनेने कर्तव्य करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. निवृत्तीचा विचार मनाला त्यामुळे शिवतही नाही. माझा प्रवृत्ती-मार्गच निवृत्ती मार्ग झाला. प्रापंचिकांना त्यामुळेच एक दिलासा मिळत गेले.प्रपंचात राहूनही स्व-कल्याण करता येते, आत्मात्कर्ष साधना येतो, हे मला अनुभवानेच समजू लागले. पिकलेले फळ पडून जाते. ते पुन: वृक्षाला डकविता येत नाही. तसेच केलेले कर्म संपले की त्यासंबंधी मी ममत्व ठेवत नाही. कार्य झाले हाच आनंद. सर्व कार्याची समाप्ती आनंदात व्हावी. हा आनंद कल्पतरू असाच बहरलेला असावा, असे नित्य स्मरणात मी ठेवत आले.

हे असे विचार पक्व व्हायलाही मला मौन व ध्यान उपयोगी पडत आले. त्या दोन्ही गोष्टी माझ्या इतक्या सरावाच्या झाल्या आहेत की त्या जीवनाच्या अंगच बनल्या आहेत मला वाटते स्त्रियांनाही मौनाचा स्वीकार करावा वाङ्मयातून स्त्रियांच्या बडबडण्यासंबंधी अनेक गोष्टी माझ्या वाचणेत आल्या आहेत. त्याहीवेळी असे वाटे की स्त्रियांनी मौनाचा स्वीकार का करू नये ? घरातील पुष्कळसे कटु प्रसंग तर केवळ संभाषणातूनच उद्‌भवतात. आपले मन उदास असेल अशा वेळी कुणी विनोद केला तर तो आपणास रू चत नाही. आपण चिडतो. दुरू त्तरे होतात. शब्दाला शब्द वाढतात. गैरसमज निर्माण होतो. समोरची व्यक्ती काय सांगतो हे ऐकण्याच्या मूडमध्येच आपण नसतो. त्यामुळे त्याचा सांगण्याचा विपर्यास आपण करतो. त्यातून राग-व्देष तयार होतात. दुसरा काय सांगतो, त्याचा मुद्दा काय आहे, त्याच्या सांगण्यातील सत्य काय आहे, असत्य काय हे जाणयाला आपण तयार नसतो.

मला माहित आहे की ज्यावेळी मी वर्गावर जात असे तेव्हा शिक्षक नुसते मुलांना शिकवितच असतात. शिकवणे हाच त्यांचा धर्म. आपणलाही शिकायला हवे, हे बहुतेक सारे विसरतात.शिक्षकाने जणु शिकणे बंदच केले आहे. केवळ मॅट्रीक, डी. एड् झालेले शिक्षकही स्वत: काही वाचत नाही. नवीन ज्ञान मिळविता नाही. जगातील समस्यांचाही विचार करीत नाही. आपणही देशाचे काही देणे लागतो, हा विचार ही त्यांच्या ठिकाणी नसतो. शिक्षकांची पिढी अशी असल्यावर शिक्षण सकस कसे होणार ? मला गोष्टीचे फार दु:ख होते. माणसाने नित्य नवीन नवीन विचार, नवीन ज्ञान जाणून घेतले पाहिजे. देशोदेशी इतके विपुल ज्ञान वाढत असता आमच्या गुरू -जनांनी त्यापासून विमुख राहावे, हे मला पटत आणि त्यांना पटवूनही देता येत नाही. गुरू -शिष्याचे संबंध आता लोपत चालले आहेत, अनासक्त व इ

ानी शिक्षक मिळणे ही दुर्लभ गोष्ट होत चालली आहे. संस्कारांचे व शिक्षकांचेही वाकडे आहे. भारंभार पुस्तके व शिकवण्या या खालची मुलांची चिमुकली जीवने दग्ध होताना आता पाहावे लागत आहे. ज्यांच्या हाती देशाची धुरा द्यायची , व्यापार द्यायचा, घरे सोपवायची, धर्म-संस्कृतींची प्रतिष्ठाने सोपवायची ते हात बळकट नकोत का ? नव्या पिढीकडे आस्थाने, प्रेमाने, सहकार्याने पाहिले पाहिजे. त्यांच्यात नवीन समस्यांची उकल करण्याचे, नवीन प्रश्नांना समजून घेण्याचे धाष्टर्य निर्माण केले पाहिजे. ज्यांना ते सामर्थ्य लाभणार नाही, ते समाजाच्या उपयोगी पडणार नाहीत.समस्यांचे विश्व मानव समाजाभोवती कायमचे असते. परंतु अंधश्रध्देने, देव-देवतांच्या खोट्या कल्पनांनी ते विश्व जाणून घेता येत नाही. त्यामुळेच भोंदू लोकांचे फावते. वैज्ञानिक दृष्टिकोनच त्यांच्या जीवनात येत नाही. म्हणून विविध प्रश्न शांत पणे, समंजसपणे सोडवण्याची शक्ती मानवांत आली पाहिजे.

समस्या खोट्या भुकेसारख्या असतात. ज्याला खोटी भूक असेल त्याला काहीही दिले तरी तो समाधानी होतच नाही. समाजिक शैक्षणिक किंवा राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्यांनी व्यक्तिगत प्रतिष्ठेपेक्षा देशाचे हित सर्वप्रथम पाहिले पाहिजे. परंतु तसे घडत नाही. याचे कारण ज्याचा त्याचा अहंकार. मूठभर समर्थक नसेल तरी अखिल भारतीय स्वरू पाच्या संस्था जन्माला घालण्यात येतात. हेतु हा की अखिल भारतीय स्वरूपाच्या संस्थेचा अध्यक्ष होण्यात त्याचा अहंभाव सुखावला जातो. अहंकारापुढे त्याला काहीच सुचत नाही.

म्हणून समस्या उभ्या ठाकल्या की त्या खऱ्या किती व खोट्या किती हे तपासले पाहिजे. खोट्या समस्यांच्या मागे न धावता, त्यांच्या आहारी न जाता खऱ्या समस्यांना शांतपणे, अलिप्तपणे सामोरे गेले पाहिजे.घरीदारीही जी भांडणे, वितुष्ट, व्देषभाव पाहायला मिळतात त्यातही विवेक नसतो. अल्पशा भांडणाने गैरसमजुतीने, संशयाने घरात विष कालवले जाते.

स्त्रियाना घरात फार काळ राहावे लागते. घरातील ज्या व्यक्ती असतात त्यांच्याशी त्यांचा अगदी जवळचा संबंघ येतो. शेजाऱ्याशी येतो. शेजार हा नेहमीच चांगला मिळतो असे नाही. शेजार चांगला मिळायलाही भाग्यच लागतो, असे म्हणतात. घरात जुनी-म्हातारी माणसेही असतात. त्याचे विचार, आचार, वागण्याच्या सवयी यात बदल होणे शक्य नाही. आजच्या तरू णींना त्यांच्या आचार - विचार किंवा क्रियाकांड यात मुळ्च रस नसतो. अशा वेळी जुनी पिढी-नवी पीढी असा वाद होण्याचाच धोका फार, नव्हे संघर्ष वा कलह होणारच. हे गृहीत धरू न जे जुने आहे, जाणारे आहे. संपणार आहे, त्याच्याशी विरोध न घेता शांतपणे त्या गोष्टींना निरोप द्या. दुसऱ्याचे आचार- विचार, धर्मकल्पना, क्रियाकांड, खाण्या-पिण्याच्या

सवयी या बद्दल माध्यस्थवृत्ती - केवळ प्रेक्षकाची वृत्ती स्वीकारा. चांगल्या-वाईटाचे शिक्के वापरू नका. कारण घाईघाईने चांगले-वाईट ठरवायचे नसते. आपणास पसंत नसेल तर त्यापासून दूर रहावे टीका करू नये.

माझ्या मुख्यत: भर स्त्री जीवनावर असल्याने व स्त्रिया स्वाभावने लवचिक असल्याने अनेक बदल ती पचवू शकते. तरू ण झाल्यावर विवाह होईपर्यंत पुरुषाचा स्पर्श ती टाळत असते. तिला त्यात स्वत:च्या पावित्र्याच्या रक्षणाचा भाग वाटतो. परंतु लग्नानंतर ती स्वभाव बदलते. स्वत:च्या घरातील सवयी, धर्मकल्पना, रू ढी, रीतरिवाज सोडून नवऱ्याकडील जीवनाशी एकरू प होते. सून असतानाच नवखेपणा, बुजरेपणा कमी होतो. ती आई झाल्यावर तर मग तिच्या विश्वात पुष्कळच बदल होतो. याचा अर्थ स्त्री लवचिक आहे. म्हणूनच मला वाटते की या सर्व जगातील अस्तित्वाचा मूळ कणा स्त्री आहे. समस्या सोडविताना स्त्री जितक्या शांतपणे विचार करू शकते तितका पुरू ष करू शकत नाही. स्त्रीशक्ती जागृत केली तर भारतातीलच नव्हे तर जगातील पुष्कळ समस्या सुटू शकतील. स्त्रीला सतत दुय्यम स्थान किंवा अपवादात्मक स्थान दिले जाते ते योग्य नव्हे. तिच्या ठायी असलेला आत्मा हा देखील परमेश्वरच आहे. त्याची जाण जितक्या लवकर येईल तितका हा देश अधिक सुजलां, सुफलां होईल, असा माझा विश्वास आहे.